**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक २४/०३/२०२५ ( सोमवार )** **संध्याकाळ**

---

## अवैधरीत्या गांजा (मादक पदार्थ) बाळगुन ,वाहतुक करणारा आरोपी ताब्यात , १ लाख ७६ हजार १६० रूपयांचा मुद्देमाल जप्त

## नरखेड पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक २४/०३/२०२५ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, आरोपी नामे—बाबु गुलाबराव वर्मा, वय ४६ वर्षे, रा. येरला पावडे,ता. नरखेड हा त्याच्या मोटार सायकल वर अवैधरित्या गांजाची वाहतुक करणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी परसोडी रोडवर नाकाबंदी केली असता एक इसम संशयीतरित्या एका विनाक्रमांकाचे मोपोड टि व्ही एस ज्युपीटर वाहनावर येताना दिसला असता त्यास थांबवुन त्याचे नाव पत्ता विचारले . आरोपीने त्याचे नाव **बाबु गुलाबराव वर्मा, वय ४६ वर्षे रा. येरला पावडे,ता. नरखेड** असे सांगितले त्याच्या गाडीची व त्याची पंचासमक्ष झडती घेतली असता आरोपीचे ताब्यातुन **३.८०८ कि. ग्राम अंमली पदार्थ गांजा, किंमती असा एकुण ७६,१६०/— रुपये आणि विनाक्रमांकाचे मोपोड टि व्ही एस ज्युपीटर वाहन किंमती १,००,०००/— रुपये असा एकुण १,७६,१६०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे**

आरोपी बाबु गुलाबराव वर्मा, वय ४६ वर्षे रा. येरला पावडे,ता. नरखेड याच्या विरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हा अंतर्गत पोलीस स्टेशन काटोल आणि पोलीस स्टेशन बेला  येथे घेण्यात आली शांतता समिती बैठक.

नागपुर ग्रामीण जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच आगामी सणोत्सव असल्याने मा श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन काटोल आणि पोलीस स्टेशन बेला येथे शांतता समितीची बैठक घेण्यात आली आहे.

१.दिनांक २३/०३/२०२५  रोजी श्री बापु रोहोम, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल यांचे  अध्यक्षेखाली सुभाष चौक, पेठ बुधवार येथे मोहल्ला कमिटीचे सभासद , जामा मस्जिद कमेटी सभासद , हत्ती खाना येथील मोहल्ला कमिटीचे सभासद आणि शहर मस्जिद कमेटी सभासद यांची बैठक घेण्यात आली. बैठकी मध्ये सर्व नागरिकांना आगामी सणोत्सव दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन जातीय सलोखा ठेवण्याबाबत, नागपुर शहर येथे झालेल्या दंगली बाबत कोणीही असामाजिक किवा खोटया अफवा विश्वास ठेवु नये तसेच पसरवु नये, तसेच सोशल मिडीया सोशिल मिडीयाचा कोणीही गैरवापर करू नये तसेच असे काही निदर्शनास आल्यास नागरिकांनी तात्काळ पोलीसांना माहीती दयावी याबाबत मार्गदर्शन व  सूचना देण्यात आल्या व गावात शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले. सदर वेळी काटोल पोलीस स्टेशन चे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री निशांत मेश्राम यांनी सुध्दा मार्गदर्शन करून कायदा व  सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत नागरिकांना सुचाना दिल्या.

१. पोलीस स्टेशन बेला  येथे दिनांक २४/०३/२०२५ रोजी श्री. दिपक अग्रवाल साहेब, सहा. पोलीस अधिक्षक, नागपुर विभाग, नागपुर यांचे अध्यक्षते खाली पोलीस स्टेशन बेला हद्दीतील महीला समिती, शांतता समिती, प्रतिष्ठित नागरिक तसेच मस्जिद कमिटी व पत्रकार संघ, बंजरंग दल यांची मिटींग घेतली  आगामी सणोत्सव शांततेत पार पाडणेबाबत, नागपुर शहर येथे झालेल्या दंगली बाबत कोणीही असामाजिक किवा खोटया अफवा विश्वास ठेवु नये तसेच पसरवु नये, तसेच सोशल मिडीया सोशिल मिडीयाचा कोणीही गैरवापर करू नये, जातीय तेढ होवुन धार्मिक भावना दुखावतील अशा पोस्ट ,

रिल, स्टेटस ,स्टोरी सोशल मिडीयावर पोस्ट करू नये. जातीय सलोखा ठेवुन  कायदा सुव्यवस्था कायम राखावा या करीता मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सर्वांचे समस्या जाणुन घेवुन त्यांचे समस्याचे निराकारण करण्यात आले. यावेळी बेला पोलीस स्टेशनचे ठाणेदार सहा. पोलीस निरीक्षक श्री चेतनसिंग चव्हाण यांनी सायबर गुन्हे ,सोशल मिडीया याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.









पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर